# आशिष

## रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# आशिष

फुल उमलले फुल उमलले
सुगंधे त्याच्या आसमंत बहरले ||धृ||

पहिले वहिले फुल ते
वेलीवर उमलले
मायबाप आजी आजोबा मामा मावशा
भ्रामर रूपे फेर धरोनी गुण गुणू लागले ||१||

काय तयाचे कवतिक
भान हरपूनी पाहती एकटक
दारी परस दारी शेजारी अंगणी माजले स्तोम
नामे तयाला म्हणती ओम ||२||

कुणी म्हणती नंद कुणी आनंद
नंद आनंद एकच खरा
आमचा आपला श्री गणेशरूपी ओमच बरा
रिध्दी सिध्दीचा नायक
बालक रूपे अवतरला आमच्या घरा ||३||

फुलल्या फुला आशिष काय दे}
रडो पडो झडो आनंदे बागडो
आयुष्य आमचे तयाला जडो
यशाच्या शिखरावर मात करोनी
सदानंदाची ध्वजा फडफडो ||४||